।।श्री राम समर्थ।।
।।श्री नागनाथ प्रसन्न।।
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १९५ वा | सोमवार, दि. ०९ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नान्नज डांबरी रोडच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

कृषी विषयक
मिरची, सिमला मिरची, पपई, वांगी, कलिंगड, खरबूज, काकडी पिकांवरील थ्रिप्स, पांढरी माशी, कोळी, व्हायरस, चुरडा-मुरडा नियंत्रणासाठी, जलद वाढ, फुटव्यासाठी, पिकांची रोगप्रतिकारक, किड प्रतिबंधक शक्ती, उष्णतेचा ताण सहन करण्याची क्षमता वाढवण्यासाठी एकमात्र अनुभवसिध्द औषधी 'प्रतिकार', 'प्रहार', 'प्रतिबंध' महाराष्ट्रात कोठेही पाठवले जाईल.
संपर्क :
कुदरत अ‍ॅग्रो ऑरगॅनिक्स
9970115450


# कर्जाच्या ओझ्याखाली शेतकऱ्यांकडून किडनीचा सौदा

- कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांना शेवटचा पर्याय म्हणून स्वतःचं शरीरच का विकावं लागतंय?
- सावकारी, वाढतं व्याज आणि हमीभावाचा अभाव या साखळीला तोडण्यासाठी व्यवस्था नेमकी कुठे कमी पडतेय?
- शेतकऱ्यांच्या हतबलतेपर्यंत परिस्थिती जाईपर्यंत प्रशासन आणि समाज का जागं होत नाही?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात शेतीचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चाललाय, हे आपण वारंवार ऐकतो. पण कर्जाच्या जाचेला कंटाळून शेतकऱ्यांनी थेट आपली किडनी विकल्याची बाब विधानसभेत अधिकृतरीत्या समोर आली आणि सगळ्यांच्याच अंगावर काटा आला. महाराष्ट्र विधानसभेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना महाराष्ट्र गृह विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात कर्ज फेडण्यासाठी तब्बल १९ शेतकऱ्यांनी आपली किडनी विकल्याची प्रकरणे नोंद झाली आहेत.

ही माहिती समोर येताच राज्यात खळबळ उडाली.

गृह विभागाच्या लेखी उत्तरात स्पष्ट करण्यात आले की, ही प्रकरणे विशेषतः सोलापूर, चंद्रपूर आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये आढळून आली.

आमदारांनी सावकारी कर्जाच्या वाढत्या तक्रारी आणि अवयव विक्रीच्या संशयित रॅकेटबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना काही शेतकऱ्यांनी कर्जाच्या दबावाखाली किडनी विकल्याची कबुलीच सरकारला द्यावी लागली.



### परदेशात नेऊन किडनी विक्रीचे व्यवहार

या सगळ्यात सोलापूर जिल्ह्यातील प्रकरण सर्वाधिक धक्कादायक ठरलं.

तपासात उघड झालं की, एका मध्यस्थाने अनेक शेतकऱ्यांना परदेशात नेऊन किडनी विक्रीचे व्यवहार घडवून आणले. काही प्रकरणांमध्ये कंबोडियातील रुग्णालयांचा वापर झाल्याची माहितीही समोर आली आहे. आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठी रक्कम मिळेल, असं आमिष दाखवून हा व्यवहार केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी अनेक आरोपींना अटक करण्यात आली असून, तपास सुरू आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील एका शेतकऱ्याची कहाणी तर धक्का देणारी. अल्प रकमेचे कर्ज घेतलेले असताना त्यावर वाढत गेलेले व्याज, सावकारांचा तगादा आणि जमीन जप्तीची कारवाई या सगळ्यामुळे तो अक्षरशः हतबल झाला. शेवटी कर्जमुक्तीचा दुसरा कोणताही मार्ग दिसेनासा झाल्याने त्याने स्वतःची किडनी विकण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली. ही केवळ एका व्यक्तीची कथा नाही तर ग्रामीण भागातील आर्थिक विवंचनेचं तीव्र चित्र आहे.

### शेतकऱ्यांनी टोकाचा निर्णय घेण्यामागील कारणे

शेतकऱ्यांनी टोकाचा निर्णय घेण्यामागे अनेक परस्परांशी जोडलेले आर्थिक व सामाजिक कारणे आहेत. खासगी सावकारांकडून घेतलेल्या कर्जावरील प्रचंड व्याजदर आणि त्यावर वाढत जाणारे व्याज यामुळे मूळ रकमेपेक्षा अनेकपट पैसे फेडावे लागतात, तर शेतीमालाला हमीभाव नसल्याने आणि उत्पादन खर्च वाढल्याने उत्पन्नात तफावत निर्माण होते. दुष्काळ, अवकाळी पाऊस व पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे उत्पन्न घटते, आणि बँकांकडून कर्ज मिळण्यात कागदपत्रे, तारण किंवा थकीत कर्जामुळे अडचणी येतात.

सावकारांचा तगादा, सार्वजनिक अपमान व जमीन जप्तीची भीती यामुळे सामाजिक दबाव वाढतो. यासोबतच मुलांचे शिक्षण, आरोग्यखर्च व घरखर्च भागवण्याची जबाबदारी आणि आर्थिक पुनर्वसनाचा अभाव यामुळे निराशा वाढते. काही वेळा मध्यस्थांकडून मोठी एकरकमी रक्कम मिळण्याचे आमिष दाखवले जाते, ज्यामुळे परिस्थिती आणखी बिकट बनते आणि शेतकरी टोकाचा निर्णय घेतात.

### अवैध अवयव विक्रीच्या जाळ्याचा विस्तार

गृह विभागाच्या माहितीनुसार, या संपूर्ण प्रकरणात सावकारी करणारे आणि अवयव विक्री व्यवहारात सहभागी असे एकूण ११ जण आरोपी आहेत. त्यापैकी आठ जणांना अटक करण्यात आली आहे, तर काही आरोपींचा शोध सुरू आहे. पोलिसांनी संबंधित प्रकरणांमध्ये गुन्हे नोंदवून तपास गतीमान केल्याचं सांगितलं आहे. अवैध अवयव विक्रीच्या जाळ्याचा विस्तार किती आहे, हे तपासातून स्पष्ट होणार आहे.

शेतीमालाला न मिळणारा हमीभाव, वाढते उत्पादन खर्च, नैसर्गिक आपत्ती आणि कर्जाचा बोजा या सगळ्या गोष्टींचा परिणाम शेतकऱ्यांच्या आयुष्यावर होत आहे. बँकांकडून कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणींमुळे अनेक शेतकरी खासगी सावकारांकडे वळतात आणि तिथूनच संकटाची खरी सुरुवात होते. जादा व्याजदर, तगादा आणि सामाजिक दबाव यामुळे परिस्थिती हाताबाहेर जाते. अशा अवस्थेत काही शेतकरी टोकाचा निर्णय घेत असल्याचं या प्रकरणातून स्पष्ट होतं.

### ठोस कर्जमाफीच्या मागणीला जोर...

या घटनेनंतर विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. शेतकऱ्यांसाठी ठोस कर्जमाफी, सावकारीविरोधी कडक कारवाई आणि आर्थिक पुनर्वसनाच्या योजना राबवण्याची मागणी केली जात आहे. सरकारनेही या प्रकरणांची गंभीर दखल घेत तपास सुरू असल्याचं सांगितलं आहे. मात्र, केवळ कारवाई करून प्रश्न सुटणार नाही; तर शेतकऱ्यांना दीर्घकालीन आर्थिक आधार देणारी व्यवस्था उभी करावी लागेल, अशी भावना व्यक्त होत आहे.

### अस्वस्थ करणारा प्रश्न...

शेतकऱ्यांच्या हतबलतेपर्यंत परिस्थिती जाईपर्यंत प्रशासन आणि समाज जागं का होत नाही, हा खरोखरच अस्वस्थ करणारा प्रश्न आहे. अनेकदा समस्या हळूहळू वाढत जाते, पण ती टोकाला पोहोचेपर्यंत तिची तीव्रता लक्षात येत नाही.

शेतकऱ्यांचे प्रश्न हे ग्रामीण भागापुरते मर्यादित राहतात; शहरांमध्ये त्याचा आवाज पोहोचत नाही. कर्ज, नापिकी, बाजारभावातील चढ-उतार या गोष्टी रोजच्या वास्तवाचा भाग बनतात आणि त्याची सवयच जणू सगळ्यांना होते.

प्रशासनाकडे योजनांची कमतरता नसते, पण अंमलबजावणीतली ढिलाई, कागदोपत्री अडथळे आणि स्थानिक पातळीवरील भ्रष्टाचार यामुळे मदत वेळेवर पोहोचत नाही. समाजही अनेकदा "ही त्यांची समस्या" म्हणून दुर्लक्ष करतो. जेव्हा एखादी धक्कादायक घटना घडते, तेव्हाच चर्चा पेटते. पण खरी गरज आहे ती संकट उंबरठ्यावर येण्याआधीच संवेदनशीलपणे हस्तक्षेप करण्याची.

# काळ्या रंगाने रंगपंचमी साजरी करत मराठा समाजाचे आंदोलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजावर झालेल्या कथित राजकीय अन्यायाच्या निषेधार्थ हिंदवी स्वराज्य भवन येथे मराठा समाजाच्या वतीने रंगपंचमी काळ्या रंगाने साजरी करून निषेध व्यक्त करण्यात आला. मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन करत भाजपच्या स्थानिक नेत्यांवर तीव्र नाराजी व्यक्त केली.



मराठा समाजावर राजकीय अन्याय केल्याचा आरोप करत पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे आणि शहराध्यक्ष रोहिणी ताई तडवळकर यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. यावेळी समाजातील कार्यकर्त्यांनी एकत्र येत काळा रंग उधळून प्रतीकात्मक निषेध नोंदविला. मराठा क्रांती मोचार्चे नेते राम भैय्या जाधव यांनी यावेळी बोलताना सांगितले की, सोलापूर महापालिकेतील महापौर पदासाठी यंदा सर्वसाधारण जागा असताना मराठा समाजाला संधी मिळण्याची शक्यता होती. मात्र भाजपच्या प्रमुख नेत्यांनी मराठा समाजाचा महापौर न करता समाजावर राजकीय अन्याय केला आहे. १९९३ मध्ये सपाटे यांच्या नंतर तब्बल ३२ वर्षांत मराठा समाजाला महापौरपदाची एकही संधी देण्यात आलेली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

जाधव पुढे म्हणाले की, या अन्यायाच्या निषेधार्थ गेल्या महिनाभरापासून विविध प्रकारची आंदोलने करण्यात येत आहेत. रक्ताने पत्र लिहिणे, मुंडण आंदोलन, मूक आंदोलन आणि अर्धनग्न आंदोलन अशा विविध मार्गांनी शासन आणि पक्षाच्या नेत्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जात आहे. तरीही याबाबत सकारात्मक निर्णय झालेला नाही.

सोलापूरच्या दोन्ही लोकसभा मतदारसंघांमध्ये मराठा समाजाचे मोठे प्राबल्य असल्याचे सांगत त्यांनी इशारा दिला की, समाजाला न्याय मिळाला नाही तर आगामी काळात सोलापूर शहर उत्तर, मध्य, दक्षिण, मोहळ, पंढरपूर, माळशिरस, माढा, करमाळा, अक्कलकोट आणि बार्शी या मतदारसंघांमध्ये मराठा समाज मतदानातून आपली भूमिका स्पष्ट करेल.

यावेळी मराठा समाजाच्या वतीने काही मागण्या देखील करण्यात आल्या. त्यामध्ये सध्याचे महापौर विनायक कोंड्याल यांचा राजीनामा घेऊन मराठा समाजाचा महापौर करावा किंवा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या पहिल्या अडीच वर्षासाठी कुणबी-मराठा समाजाला संधी द्यावी, तसेच महापौर पदासाठी अडीच वर्षांच्या कालावधीत मराठा समाजाला संधी देण्याची मागणी करण्यात आली.

आंदोलकांच्या मते, १९९३ नंतर सोलापूरमध्ये साळी समाजाला तीन वेळा, मुस्लिम समाजाला दोन वेळा, लिंगायत समाजाला दोन वेळा, लमाण समाजाला दोन वेळा तसेच कैकाडी, धनगर आणि बौद्ध समाजाला प्रत्येकी एकदा विविध पक्षांकडून महापौर पदाची संधी देण्यात आली आहे. मात्र मराठा समाजाला गेल्या ३२ वर्षांत एकदाही ही संधी देण्यात आलेली नाही, ही अत्यंत दुदैर्वी बाब असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या आंदोलनात मराठा समाजातील अनेक कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार: SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार: SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL: HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007


# टीम इंडियाने सलग दुसऱ्यांदा कोरले टी-20 विश्वचषकावर नाव!

## न्यूझीलंडचा ९६ धावांनी उडवला धुव्वा

**अहमदाबाद (वृत्त सेवा):-** आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ चा महाअंतिम सामना यजमान भारत आणि न्यूझीलंड या दोन बलाढ्य संघांमध्ये नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला गेला. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने इतिहाल रचला आहे. न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करुन टी-२० विश्वचषकावर सलग दुसऱ्यांदा नाव कोरले आहे. त्याआधी भारताने २००७ मध्ये धोनीच्या नेतृत्वाखाली ट्रॉफी जिंकली होती. त्यानंतर मोठी वाट पाहत २०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वात ट्रॉफी उंचावली होती तर आता सूयार्सेनेच्या नेतृत्वात भारत पुन्हा टी-२० विश्वविजेता ठरला आहे. या सामन्यात भारताने अनेक मोठे रेकॉर्डसही नावावर केले आहे.

भारताने घरच्या मैदानावर टी-२० वर्ल्ड कप जिंकणारा भारत हा पहिलाच देश ठरला. सलग दोन वर्ल्ड कप जिंकणारा भारत हा पहिलाच देश ठरला. म्हणजे टी-२० विश्वचषक जिंकलाच नाही तर त्यासोबतच भारतीय संघाने इतिहास रचला आहे.





### बुमराह आणि बापूची घातक गोलंदाजी

त्यानंतर लक्ष्याचा पाठलाग करण्यालाठी आलेल्या किवी संघाची सुरुवात वाईट झाली. सलामीवीर फिन ॲलन ९ धावा करताच माघारी परतला. टिम सेफर्टने ५२ धावा करत संघाल थोडे योगदान दिले. त्यानंतर अक्षर पटलने फिरकी मारा करत धडाधड विकेट पाडायला सुरुवात केली. न्यूझीलंड कर्णधार मिचेल सँटनरने संघाला सावरायला सुरुवात केले पण तोही ४३ धावा करुन बाद झाला. भारताकडून जसप्रीत बुमराहने घातक मारा करत किवीचे कंबरडे मोडले अन ४ ओव्हर्स टाकून ४ विकेट घेत फक्त १५ धावा दिल्या. न्यूझीलंडचा संघ १९ षटकात फक्त १५९ धावा करु शकला.

### न्यूझीलंडविरुद्ध भारताची 'कत्तल' फलंदाजी!

त्याआधी, नाणेफेक गमावून न्यूझीलंडने भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रिक केल. टीम इंडियाने कोणतीही दया मया न दाखवता किवी संघाला धुवायला सुरुवात केली. भारतीय ओपनरने जी तोडफोड केली ते थांबलेच नाही. पूर्ण विश्वचकात फार्म न मिळालेला अभिषेक शर्मा फायनला तापला आणि त्याने २१ चेंडून ५२ धावांची घातक खेळी केली. तसेच आपल्या जबरदस्त फार्म असलेल्या संजूने आज पुन्हा चमत्कार केला. त्याने ४६ चेंडून ५ चौकार आणि ८ षटकारासह ८९ धावांची खेळी केली. भारतीय संघात पुनरागमन करणार इशान किशन या सीजनमध्ये चांगलात गाजला त्याने २५ चेंडूत ५४ धावा केल्या. शेवटी शिवम दुबेने परफेक्ट फिनिशरची भूमिका निभावली त्याने ८ चेंडूत २ षटकार आणि ३ चौकारसह २६ धावा करत कहर केला आणि किवीसंघासमोर २५६ धावांचे लक्ष्य ठेवले. न्यूझीलंडकडून नशीम जेम्सने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या. तर रचिन रवींद्र आणि मॅट हॅनरी एक विकेट मिळाली.

# आता २५ दिवसांनंतरच दुसरा गॅस सिलिंडर

## युद्धामुळे घरगुती गॅसची टंचाईसदृश्य स्थिती



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इराण-इस्राईलमधील युद्धाचा परिणाम थेट गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यावर झाला आहे. युद्धामुळे होणारी गॅसची आयात प्रभावित झाली आहे. त्यामुळे सध्या उपलब्ध असलेल्या गॅसचे तीनही कंपन्यांकडून नियोजन करण्यात आले आहे.

आता पहिला घरगुती गॅस सिलिंडर मिळाल्यानंतर दुसऱ्या सिलिंडरचे बुकिंग करण्यासाठी २५ दिवसांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यामुळे घरगुती गॅस सिलिंडरचे वाटप काटकसरीने करावे लागणार आहे.

पहिल्या गॅस सिलिंडरची डिलिव्हरी झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी सिलिंडर बुकिंग करता येणार नाही. मोबाईलवरून बुकिंग करण्याचा प्रयत्न केल्यास ते स्वीकारले जाणार नाही. उलट कंपनीकडून २५ दिवसांनंतर बुकिंग करण्याचा मेसेज येणार आहे. त्यामुळे सध्या उपलब्ध असलेला गॅस सिलिंडर २५ दिवस काटकसरीने वापरावा लागणार आहे. कंपन्यांकडून घरगुती गॅस सिलिंडर उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जात असून कमर्शिअल (व्यावसायिक) गॅस सिलिंडरचा पुरवठा सध्या कमी होण्याची शक्यता आहे.

### कंपन्यांनी हा निर्णय का घेतला?

दुसरा घरगुती सिलिंडर बुकिंग करण्यासाठी २५ दिवसांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्यांनी हा निर्णय घेतला आहे. साधारणपणे ४ ते ५ सदस्यांच्या कुटुंबासाठी एक गॅस सिलिंडर सुमारे ३० दिवस वापरात येतो. काही जण पहिला सिलिंडर वापरात असतानाच दुसरा सिलिंडर बुक करतात. मात्र आता हा पर्याय बंद करण्यात आला आहे. भारत गॅस आणि हिंदुस्थान गॅस कंपनीने २५ दिवसांचा, तर इंडियन ऑइल कंपनीने ३० दिवसांचा कालावधी निश्चित केला आहे.

### कंपन्यांनी सॉफ्टवेअरमध्ये केला बदल

घरगुती गॅस सिलिंडरची सध्या कोणतीही टंचाई नाही. मात्र उपलब्ध असलेल्या सिलिंडरची कमतरता भासू नये, यासाठी ही खबरदारी घेतली जात आहे. सध्या सिलिंडर बुकिंग केल्यानंतर ४८ तासांच्या आत गॅस सिलिंडर उपलब्ध होतो. मात्र आधीसारखे दुसऱ्या सिलिंडरचे बुकिंग लगेच करता येणार नाही. २५ दिवसांनंतरच दुसरा गॅस सिलिंडर बुक करावा लागणार आहे. कंपन्यांनी सॉफ्टवेअरमध्ये त्यानुसार बदल केले आहेत.

**- सागर भोमाज, सागर गॅस एजन्सी, सोलापूर**

# मुलींना लाठ्याकाठ्यांचे प्रशिक्षण कमवा आणि शिका योजनेतून 2000 रुपये मिळणार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महिला सबलीकरणासाठी केवळ महिलांनीच नव्हे तर सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजे. सांगली जिल्ह्यामध्ये महिला सबलीकरणासाठी आम्ही नवीन प्रयोग केला.

यातून 50 शाळांमधील 36 हजार मुलींना दर आठवडा एक तास शनिवारी कराटे आणि ज्युडो प्रशिक्षण (Judo and karate training) आम्ही दिले. त्यातील पहिला येलो बेल्ट 15 हजार 400 मुलींना आम्ही आज दिला आहे. त्याच्या पुढचे बेल्ट मिळवण्यासाठी जे जे शुल्क द्यावे लागते ते प्रशासन देणार आहे. त्याचबरोबर जून महिन्यापासून प्रत्येक शाळेत स्वसंरक्षणासाठी लाठीकाठीचे प्रशिक्षण देणार येणार असल्याची घोषणा चंद्रकांत पाटील (Chandrakant Patil) यांनी केली. ते रविवारी सांगलीत आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

राज्यातील महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या 5 लाख मुलींना कॉलेज फी नाही, होस्टेल फी नाही. या व्यतिरिक्त दर महिना दोन हजार रुपये कमवा आणि शिका योजनेतून देणार असल्याची घोषणा उच्चतंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. सांगलीतील मुली व महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत कराटे प्रशिक्षण झालेल्या मुलींना येलो बेल्ट आणि प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार विशाल पाटील, आमदार इद्रिस नायकवडी, जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांच्यासह अधिकारी, कराटे प्रशिक्षण घेतलेल्या मुली मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

महिला दिनानिमित्तच्या कार्यक्रमात कन्या सबलीकरण उपक्रमांतर्गत मुलीचे मोफत सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण पाहून मला माज्या मुलींची आठवण झाली. मला ही दोन मुली आहेत. हे मुलींचे कराटे प्रशिक्षण पाहून माझे म्हातारपण सुखरूप जाईल, असे खासदार विशाल पाटील (MP Vishal Patil) यांनी वक्तव्य करताच कार्यक्रमात हशा पिकला.

सांगलीमध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने कन्या सबलीकरण उपक्रमांतर्गत मोफत सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला.

यावेळी कराटे प्रशिक्षण घेतलेल्या जवळपास 1हजार मुलींना यलो बेल्ट ग्रेड प्रमाणपत्रचे वितरण पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमात खासदार विशाल पाटील बोलत होते.

## संपादकीय

# बेलगाम युद्ध

इराणवर अमेरिका आणि इस्रायल या दोन देशांनी संयुक्तपणे हल्ला करून जे युद्ध छेडले आहे ते युद्ध खामेनी यांच्या हत्येनंतर आटोक्यात येईल असे वाटले होते, पण त्याची व्याप्ती आता आणखीनच वाढली असून हा संघर्ष बेलगाम पातळीवर गेला आहे.

इस्रायल आणि अमेरिकेच्या हल्ल्यात इराणचे राष्ट्रप्रमुख खामेनी यांच्याबरोबरच त्या देशाची जवळपास सगळी महत्त्वाची लीडरशिप गारद झाली. अनेक महत्त्वाचे लष्करी अधिकारीही मारले गेले. हा तडाखा अतिप्रचंड स्वरूपाचा होता, त्यातून इराण सावरण्याची शक्यता नाही, असे वाटत असतानाच इराणने आपली उरलीसुरली शक्ती वापरात आणून अंदाधुंद प्रतिसाद द्यायला सुरुवात केली आहे.

आखातातल्या जवळपास आठ देशांवर इराणने क्षेपणास्त्राद्वारे मारा केला. इस्रायलवरही नव्याने हल्ला करताना थेट नेतान्याहू यांच्या कार्यालयालाही इराणने लक्ष केल्याचे वृत्त आहे. अमेरिकेची काही लढाऊ विमानेही इराणने पाडली, तसेच युरोपीय देशांच्याही काही लष्करी ठिकाणांवर इराणने हल्ले केल्याने या युद्धाची व्याप्ती आज अचानक वाढल्याचे लक्षात येते. ही परिस्थिती लक्षात घेऊन आखातात ब्रिटनचे जे काही लष्करी तळ आहेत त्या तळांचा वापर करण्याची अनुमती अमेरिकेने ब्रिटनकडे मागितली आणि ब्रिटननेही अमेरिकेला तातडीने ती अनुमती दिली आहे.

ब्रिटन बरोबरच फ्रान्स, जर्मनी आणि अन्य काही युरोपीय देशांनी अमेरिकेचे समर्थन करून त्यांना साथ देण्याची भूमिका घेतली आहे, त्यामुळे हा मामला आता आणखीन गंभीर बनला असून आता एकाकी पडलेल्या इराणच्या बाजूनेही रशिया आणि चीन सारखे देश उतरतील काय अशी नवी शंका निर्माण झाली आहे. हे सगळे होत असतानाच हेजबुल्ला संघटनेनेही इराणच्या समर्थनार्थ इस्रायलवर हल्ले सुरू केले, त्यांना काबुत आणण्यासाठी इस्रायलने लेबनॉनवर हल्ले केले, तेथे मोठी जीवितहानी झाली. या सगळ्या घडामोडी उर्वरित जगाची झोप उडवर्णाया आहेत.

इराणकडून जसे प्रत्युत्तराचे हल्ले सुरू झाले तसा अमेरिका आणि इस्रायलचा इराणवर नव्याने मारा सुरू झाला आहे. इराणवर अंदाधुंद बॉम्बफेक सुरू असून त्या देशात मृत नागरिकांचे अक्षरशः ढीग रचले गेल्याचे एका वृत्तांत म्हटले आहे. इराणमधील मृतांच्या नेमक्या संख्येचा अंदाज अजून लागू शकलेला नसला तरीही एका आंतरराष्ट्रीय संस्थेने इराणमध्ये सुरुवातीच्या दोन दिवसातच किमान 555 नागरिक ठार झाल्याची प्राथमिक माहिती दिली. पहिल्याच हल्ल्यात खामेनी आणि इराणच्या महत्त्वाच्या नेत्यांचा खात्मा केल्यानंतर हे युद्ध आटोक्यात येईल किंबहुना इराण भयभीत होऊन, दिशाहीन होईल असे जे वाटले होते तसे अजिबात झालेले दिसत नाही.

इराणकडे अमेरिका आणि इस्रायलच्या तुलनेमध्ये अत्यंत मर्यादित लष्करी शक्ती आहे. त्यातच अमेरिका आणि इस्रायलने इराणच्या हवाईदलाचे कंबरडे साफ मोडले आहे, इराणच्या क्षेपणास्त्र प्रक्षेपण ठिकाणांवरही व्यापक स्वरूपात हल्ले करून ही ठिकाणे उद्ध्वस्त करण्यात आली आहेत. परंतु तरीही ज्या क्षमतेने इराणकडून प्रत्युत्तर दिले जात आहे ते अचंबित करणारे आहे. एका वृत्तानुसार इराणच्या आण्विक तळावरही हल्ला झाला आहे त्यातून ॲटोमिक रेडिएशन सुरू झाले किंवा कसे या वृत्ताची शहानिशा केली जात आहे. हे सगळे विनाशकारी रिपोर्टिंग ऐकल्यानंतर या युद्धाचा शेवट नेमका काय होईल याचा अंदाज लावणे अवघड झाले आहे.

अशा संघर्षाच्या परिस्थितीत संयुक्त राष्ट्र संघाची यंत्रणा कुठे तोंड लपवून बसलेली असते हे कळत नाही. जगातला कुठलाही संघर्ष थांबवण्याची क्षमता संयुक्त राष्ट्राकडे नाही हेच यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. युद्धखोर इस्रायल आणि अमेरिका आणि त्यांना पाठिंबा देणारे युरोपियन देश जगात हवे तिथे दादागिरी करू शकतात. कुठल्याही राष्ट्रप्रमुखाला ते ठार मारू शकतात किंवा त्याला उचलून आणू शकतात हे जे चित्र पाहायला मिळते आहे ते निराशाजनक आहे. या देशांच्या दादागिरीला आवर घालण्याची क्षमता ज्या देशांमध्ये आहे ते देशही आजच्या या संघषार्चे मूकनिदर्शक बनून राहिले आहेत हे पाहणे आणखीनच क्लेशदायक ठरले आहे.

अर्थात, इराणच्या बाजूने रशिया आणि चीन यांनी सक्रियपणे या संघर्षात उतरणे म्हणजे तिर्सया महायुद्धाला आमंत्रण देणे ठरणार आहे, त्यामुळे या दोन प्रमुख शक्तिशाली देशांनी इराणच्या बाजूने प्रत्यक्ष मैदानावर उतरावे अशी जगाची अपेक्षा नसली तरी इस्रायल आणि अमेरिकेच्या दादागिरीला आळा घालण्याची शिष्टाई तरी त्यांनी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर करायला हवी होती.

पण अद्याप चीन किंवा रशिया यापैकी एकाही देशाने इराणवर जो महाभयंकर प्रपात ओढवला आहे त्याविषयी आपली स्पष्ट प्रतिक्रियाही अद्याप दिलेली नाही. या पार्श्वभूमीवर सर्व युद्धखोर देशांच्या प्रमुखांना सद्बुद्धी सुचो आणि हा संहार त्वरित बंद होवो अशी प्रार्थना करण्यापलीकडे बाकी जगाच्या हातात काही राहिलेले दिसत नाही.

# शेळी व मेंढीसारखे जीवन किती दिवस जगायचे ?

बऱ्याच लोकांना दुसऱ्यांसोबत भांडण तंटे व वादविवाद करायला नको वाटते. असे लोक त्यांची चुकी असो अथवा नसो, ते दुसऱ्यांसोबत वादविवाद करायला अथवा त्यांना तोंड द्यायला धाडसाने सामोरे जात नाहीत. म्हणजे ते दुसऱ्यांसोबत वादविवाद घालायला जरा घाबरतात असेच म्हणावे लागेल.

त्यामुळेच की काय? बहुतांश माणसे आपल्यावर अन्याय जरी होत असला तरी ते त्या अन्यायाचा प्रतिकार करण्याऐवजी मुकाट्याने अन्याय सहन करत असतात. त्यांना जणू अन्याय सहन करण्याची सवयच लागलेली असते. भांडण तंटे व वादविवाद करून कशाला कोर्ट कचेरी व पोलीस स्टेशनच्या पायऱ्या चढायच्या, कशाला स्वतःचे आर्थिक, शारीरिक व मानसिक नुकसान करून घ्यायचे आणि उगीच कशाला दुसऱ्यांसोबत वादविवाद घालून त्यांच्यासोबत अबोला धरायचा. या कारणास्तव बरीच माणसे भांडण तंटे करायचे जाणीवपूर्वक टाळतात. मित्रांनो, या जगात कोणीच कोणाला कमी नसतो. प्रत्येकात ताकत, राग व हिंमत ठासून भरलेली असते. फरक एवढाच असतो की, कोणी तडकाफडकी प्रतिकार करण्याचा निर्णय घेतो, तर कोणी जरा संयम ठेवून प्रतिकार करण्यास पुढे सरसावतो. परंतु जे घाबरट लोक असतात, ते मात्र मुकाट्याने अन्याय व अत्याचार सहन करतात. प्रत्येकजण स्वाभिमानी व अभिमानी असतो. स्वतःच्या स्वाभिमानाला ठेच लागली तर माणसाच्या तळपायाची आग मस्तकाला जाते, माणूस प्रचंड संतापून जातो, त्याचा स्वाभिमान त्याला शांत बसू देत नाही.

तो लगेच उठून अन्यायाचा प्रतिकार करायला लागतो. परंतु आजकालचा माणूस स्वतःवर कितीही अन्याय होत असला तरी एवढा गप्पगार का बसत आहे? एवढा अन्याय सहन करूनही त्याच्यातील स्वाभिमान जागा का होत नाही? हे प्रश्न मला राहून राहून पडतात. कारण आजकाल या धरतीवर चांगल्या माणसांचा वावर प्रचंड प्रमाणात वाढला आहे. चांगली माणसे वाईट माणसाच्या नादाला लागून स्वतःचे नाव कशाला खराब करून घेतील? चिखलावर दगड धोंडा मारून स्वतःच्या अंगावर चिखलाचे शिंतोडे कशाला उडवून घेतील? चांगल्या माणसांना माहीत असते की, वाईट माणसांच्या नादी लागल्यावर लोक आपल्याला वेड्यात काढतील. वाईट माणसांना समाजात व गावात कोणीच किंमत देत नसतो. चांगली माणसे वाईट माणसांपासून चार हात लांब राहतात. कारण की, त्यांना समाजात कवडीचाही मानपान नसतो. म्हणून आपण अशा बावळट माणसांच्या नादी लागल्यावर आपल्या देखील अब्रूला व स्वाभिमानाला ठेच पोहोचू शकते. म्हणून आपण अशा बावळट व वेडसर लोकांच्या नादी लागून आपला मान सन्मान कमी का करायचा? असा विचार आजकालची सुज्ञ व जाणकार माणसे का करत नाहीत? मित्रांनो हल्ली या जगात समोरचा जसा आपल्या सोबत व्यवहार करतो, त्याच पद्धतीने आपण देखील त्याच्यासोबत तसाच व्यवहार केला पाहिजे. एखादा आपल्याला कठोर शब्दात बोलत असेल तर आपण देखील त्याला त्याच भाषेत बोलले पाहिजे. समोरचा आपल्याला जीवापाड जपत असेल, आपल्याला जीव लावत असेल, आपली किंमत करत असेल तर आपण देखील त्याला जीवापाड जपले पाहिजे व त्याच्या चांगल्या आणि वाईट काळात धावून गेले पाहिजे. समोरचा आपल्याला काहीही बोलत असेल, सार्वजनिक ठिकाणी आपला अपमान करत असेल, नाहक आपल्याला बदनाम करत असेल आणि आपल्या अंगावर मारण्यासाठी धावून येत असेल तर अशा लोकांना त्यांच्यासारखेच बनून त्यांच्यापासून होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार केला पाहिजे. तरच ती माणसे नीट वागतील. फक्त गरज आहे ती, त्यांना त्यांच्यासारखेच कठोर व आक्रमक बनून त्यांना सबक शिकवण्याची..माझ्या मते अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा मोठा गुन्हेगार समजला जातो. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला अगोदरच सांगून ठेवले आहे. बांधवांनो, जीवन जगायचे असेल तर वाघ बनून वाघासारखे जीवन जगा, शेळी व मेंढीसारखे जीवन जगण्यापेक्षा वाघासारखे जीवन जगा. आपण जेवढा अन्याय व अत्याचार सहन कराल, तेवढा जास्त अन्याय अत्याचार आपल्यावर होत असतो. समोरचा शेर असेल तर आपण सव्वाशेर होऊन जीवन जगले पाहिजे. ज्यांना माराची गरज असते, ती माणसे शब्दांनी नाही सुधारत. म्हणतात ना, लातोंके भूत बातोंसे नहीं मानते. त्यांना बोलून काहीच फायदा नसतो, त्यांना योग्य वेळी मार देऊन त्यांना चांगला सबक शिकवलाच पाहिजे, तरच ती माणसे माणसांसोबत माणसासारखा व्यवहार करतील. त्यासाठी माणसाला योग्य वेळी राग येणे फार गरजेचे आहे. नाही तर राग न आल्याचा लोक फायदा घेतात. हे आपण अगोदर लक्षात घेतले पाहिजे. तुम्ही तापट बनून समोरच्यावर चालून नाही गेलात आणि नुसता अन्याय सहन करत राहिलात तर दिवसेंदिवस तुमच्यावर अन्याय करण्याची त्याची वृत्ती वाढत जाणार. म्हणून आपण अन्यायाला वेळीच लाथाडून लावले पाहिजे. आणि स्वाभिमानाला जिवंत ठेवले पाहिजे. मित्रांनो या जगात आपल्यावर पदोपदी अन्याय, अत्याचार होत असतो. आपल्या भारत भूमीत अनेक महापुरुष व समाजसुधारक होऊन गेले. त्यांना पदोपदी अन्याय सहन करावा लागला. परंतु ते आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला कधीच घाबरून गेले नाहीत तर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वेळीच प्रतिकार करण्याचे धाडस त्यांनी दाखवले आहे. अन्यायाचा प्रतिकार करता करता आपला जीव जरी गेला तरी आपल्याला वीर मरण आले म्हणून समजा. अन्याय सहन करून मारण्यापेक्षा अन्यायाचा प्रतिकार करून मेला तर ते अधिक चांगले होईल. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, शिवपुत्र संभाजी राजे, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीमाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महापुरुषांना पदोपदी अन्याय, अत्याचार सहन करावा लागला आहे. या महापुरुषांनी आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला हिंमतीने व धाडसाने जबरदस्त चपराक मारली आहे. म्हणूनच शेवटी व्यवस्थेला सुद्धा यांच्यापुढे लोळण घ्यावी लागली. आपल्या महापुरुषांनी इथली हजारो वर्षापासून चालत आलेली जुलमी व अन्यायी राजवट नेस्तनाबूत करण्यासाठी आपले प्राण पणाला लावले आणि इथली जुलमी राजवट खिळखिळी करून टाकली. या महापुरुषांनी अन्यायाचा प्रतिकार केला म्हणून व्यवस्थेला सुद्धा त्यांच्यापुढे झुकावे लागले. म्हणून समस्त बहुजन जनतेला मी सांगू शकतो की, बाबांनो अजून किती दिवस अन्याय, अत्याचार सहन करायचा. आणखी किती दिवस भीत भीत जीवन जगायचे. आपण अन्यायावर प्रतिकार करायला कधी शिकणार?

महापुरुषांचा जीवन लढा व त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला त्यांनी कसा प्रतिकार केला व स्वतः कसे स्वाभिमानाने जगले? हे कधी जाणून घेणार? याचा विचार प्रत्येकाने करून होता होईल तेवढा आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचार लाथाडून लावण्यासाठी आपण समर्थ असले पाहिजे...तरच आपण वाघासारखे जीवन जगले म्हणून समजा...नाहीतर शेळी होऊन जीवन जगण्यात काहीच अर्थ नाही....

**– बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर
मो.7498715661

# महिला दिनानिमित्त महिला शिक्षकांचा सन्मान



**अनगर (कटूसत्य वृत्त):–** अनगर येथील श्रीअनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने कै.शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यरत असणाऱ्या 21 महिलांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले कार्यरत प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य महादेव चोपडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून या प्रशालेच्या ज्येष्ठ व माजी शिक्षिका शशिकला कोष्टीया होत्या. यावेळी त्यांनी मुलांना आहार, विहार, आचार व विचार याविषयी मौलिक मार्गदर्शन केले. त्याचबरोबर आजच्या धकाधकीच्या युगामध्ये महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिलांनीच स्वतः पुढे आले पाहिजे असे मत त्यांनी मांडले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व लोकनेते बाबुराव अण्णा पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्राचार्य महादेव चोपडे, उपप्राचार्य माधव खरात, पर्यवेक्षक राजेंद्र डोके व उज्वला घोलप, अनुराधा गोडसे, माधवी पाचपुंड, अनुपमा वरवडकर, प्राजक्ता देंडे, अनिता लांडगे, रंजना सरक, अर्चना गुंड, शमा काझी, ज्योती भडकवाड,चंद्रकला उघडे, रेश्मा गुंड, सपना झुरूळे, गितांजली माळी, प्रियंका पाडवी आणि रुपाली कदम अनिता वाघमारे, सपाना झुरळे,पूनम थिटे आदी शिक्षिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. महादेव पवार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर माधव खरात यांनी आभार मानले.

# राजराजेश्वरी शिक्षण संकुलात महिला दिन उत्साहात साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळा व माध्यमिक प्रशालेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महिला दिनाच्या औचित्यांने माता पालकांची मेहंदी, रांगोळी, लिंबू चमचा व संगीत खुर्ची स्पर्धा घेण्यात आली. प्रथम क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी प्रसिद्ध वकील सोनाली कांबळे, आकाशवाणी निवेदिका कविता वाघमारे, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी आदी मान्यवर उपस्थित होते. श्रावणी उंबरजे (जिजाऊ ), वैभवी माळी (राणी लक्ष्मीबाई), निहारिका मैले (इंदिरा गांधी) , श्रावणी वालीकर ( पोलीस), प्रिती माचर्ला (डॉक्टर), रेवती जत्ती( वकिल), भाग्यश्री गाडवे ( सावित्रीबाई फुले ), तन्वी गुंडे ( जिजाऊ), प्रियांका मंजूळकर (मिल्टरी), राधिका येलद (शिक्षिका) आदी विद्यार्थीनींनी विविध वेशभूषेत आल्याने आकर्षक दिसत होत्या.यावेळी संगीता नरगिडे, भाग्यश्री महाजन, मंजुश्री धुमशेट्टी, वैशाली गुजर, उज्ज्वला भांड,शितल चमके, सुजाता फुलारी,आशाराणी गायकवाड, शारदा गिनानी, गौरी रेके, वंदना तेली, शिवगंगा दिवटे, राजश्री जवळकोठे, बुधाळे, जिरगे, कोंकत्ती आदी शिक्षिका मंगल स्वामी, गीता चौगुले या सेविकांना लेखणी व गुलाब पुष्प गुच्छ देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आले. यावेळी स्नेहा मंचिकटला, श्रुती रेड्डी, मयुरी चिंताकिंदी, लहरी निली, प्रगती ख्याडे आदी विद्यार्थीनींनी 'हसत मुखाने ' हे गीत सादर केले.मनस्विनी पवार,लक्ष्मी अणकल, जान्हवी ईश्वरकट्टी, श्रद्धा खद्दे, श्रद्धा गाजूल, साक्षी शिरगण, सुष्मिता बुक्कानुरे आदी विद्यार्थीनींनी कॉमेडी शो हे नाटक सादर केले.पाचवीच्या विद्यार्थ्यांनी 'नारी शक्ती' या गीतांवर नृत्य सादर केले. श्रुती रेड्डी, लक्ष्मी अणकूल, अंबिका चौगुले, आकाश दुधनकर, कावेरी भारगंडी आदी विद्यार्थ्यांनी महिला दिनाचे महत्त्व सांगितले. माता पालकांसाठी आयोजित पाक कला स्पर्धेत सविता संकण्णा (प्रथम ), वैशाली भोजने (द्वितीय ),लक्ष्मी कामुर्ती( तृतीय).संगीत खुर्ची स्पर्धेत कमला निली (प्रथम), लक्ष्मी कामुर्ती (द्वितीय), सारिका जाधव (तृतीय),रांगोळी स्पर्धेत शिवगंगा दिवटे (प्रथम), नागमणी सुंचु (द्वितीय),पूजा सोमवंशी (तृतीय) लिंबू चमचा स्पर्धेत सारिका जाधव (प्रथम), ज्योती कुंभार(द्वितीय), पूजा कुलकर्णी(तृतीय)मेहंदी स्पर्धेत पूजा सोमवंशी प्रथम क्रमांक पटकाविले.

शाळेच्यावतीने सर्व विजेत्यांना भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले.प्रमुख अतिथी वकील सोनाली कांबळे यांनी पोक्सो ॲक्ट कायद्याच्या संदर्भात मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका वैशाली कुंभार म्हणाले , विद्यार्थीनींनी समाजात सन्मानाने वागण्यासाठी आई वडिलांचे व शाळेतील शिक्षकांनी केलेले संस्कार कधी ही विसरु नका. कर्तृत्ववान महिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पुढे वाटचाल करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रणाली रॅका यांनी केले तर शितल फुलारी यांनी आभार मानले.

## कविता

### शौर्य जिजाऊंचे



ज्यांच्यामुळे सारा इतिहास घडला
, आणि ज्यांनी त्यांच्या साक्षीने
इतिहासच लढवला,
त्यांना माझा पहिला
मानाचा मुजरा... !
डोळ्याची पापणी नव्हती ती
डोळ्याचा पारण होते,
नुसता स्वतःचा पुत्र नव्हता
स्वराज्याचा बाणा होता!
जिजाऊंच्या डोळ्यातच होती
तळपती तलवार,
अहो त्यांचे डोहाळे होते
ढाल आणि दांडपट्टा!
इंग्रजांची दुसरी कहाणी
म्हणजे तिचं नावच झाशीची राणी
तिच्या पाठीला
नव्हतीच कधी ढाल
तीही देशासाठीच लढली.
डोळ्यात घेऊन काळ,
आणि पाठीशी तहान बाळ!
जिने सन्मानित केले
तिला गडाची धरणी
आणि रात्रीचा दिवस करून
गड उतरली ती 'हिरकणी'
ज्यांना आई नाही ते त्यांना
ओळखतात सिंधुताई म्हणून त्यांनी
अमेरिकेचा नुसता पुरस्कार नाही
घेतला तर महाराष्ट्रात महाराष्ट्राच्या
मातेच्या संस्कार ही जपला... !
ज्यांच्या नावातच फुले त्यांनी
काट्यासारखं जीवन जगणं त्याला
म्हणतात
त्याग दुसऱ्यासाठी
हे खडतर पाऊल उचललं ते फक्त
स्त्रियांच्या शिक्षणासाठी... !
त्यांच्या शौर्याचा असतो सन्मान
अशा या रणरागिनींना माझाच नाही
तर साऱ्या महाराष्ट्राचा सलाम... !
तिच्या आयुष्यातील प्रत्येक दिवस
आनंदाने जावो
हीच सदिच्छा!
महिला दिनाच्या
शिवमय शुभेच्छा!

**– मयुरी बाबर**
**(9112443343)**

# कृतीतून शिक्षण : मुलांच्या समज वाढवणारी प्रभावी पद्धत

दप्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना शिक्षण देताना कृतीमूलक पद्धतीचा वापर करणे अत्यंत उपयुक्त ठरते. कारण लहान मुलांना फक्त पाठांतर करून शिकणे अवघड जाते, परंतु प्रत्यक्ष कृतीतून ते विषय अधिक चांगल्या प्रकारे समजून घेतात.

कृतीमूलक शिक्षणामध्ये खेळ, प्रयोग, प्रात्यक्षिके, गटकार्य आणि प्रकल्प यांचा समावेश होतो. उदाहरणार्थ, गणित शिकवताना मोजणीसाठी वस्तूंचा वापर करणे, पर्यावरण अभ्यासात झाडे–वनस्पती प्रत्यक्ष दाखवणे किंवा भाषेच्या तासात गोष्टी सांगणे यामुळे विद्यार्थ्यांचा सहभाग वाढतो.

या पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो, विचारशक्ती विकसित होते आणि ते स्वतःहून प्रश्न विचारण्यास प्रोत्साहित होतात. तसेच गटामध्ये काम करताना सहकार्याची भावना देखील निर्माण होते.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या वयानुसार आणि क्षमतेनुसार विविध उपक्रम तयार करणे आवश्यक आहे. यामुळे शिक्षण अधिक रोचक आणि परिणामकारक होते. म्हणूनच प्राथमिक शिक्षणामध्ये कृतीमूलक शिक्षणाचा वापर केल्यास विद्यार्थ्यांचे शिकणे अधिक आनंददायी आणि परिणामकारक होऊ शकते.

**– श्री. वैभव चंद्रकांत चव्हाण**
उपशिक्षक, जिल्हा परिषद
प्राथमिक शाळा केवड

# 10 मार्च रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर आणि महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अल्पसंख्यांक नोकरी इच्छूक उमेदवारांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. नोकरी इच्छुक उमेदवारांनी रिज्यूमच्या तीन प्रती व आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले आहे.

हा रोजगार मेळावा मंगळवार, दिनांक 10 मार्च 2026 रोजी सकाळी 10 ते दुपारी 1 या वेळेत "महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर" येथे होणार आहे. या मेळाव्यात 10 वी, 12 वी, आय. टी.आय. वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशियन, मशिन ऑपरेटर, बी.कॉम, एम.कॉम अशा प्रकारच्या 625 पेक्षा जास्त रिक्त पदांची भरती केली जाणार असून 11 उद्योजकांनी ऑनलाईन अधिसूचना दिली आहे. अधिक माहितीसाठी 0217–2992956 या दूरध्वनीवर संपर्क साधावा किंवा https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलला भेट द्यावी.

# चौडेश्वरवाडी येथे महिला सक्षमीकरण सप्ताह व महिला दिन साजरा



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** चौडेश्वरवाडी ता.माळशिरस येथे महिला सक्षमीकरण सप्ताह व महिला दीन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन चौडेश्वरवाडी ग्रामपंचायत, आरोग्य उपकेंद्र व अंगणवाडी यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व सावित्रीमाता फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

यावेळी सरपंच अलकाताई इंगवले देशमूख, सदस्य शिला गायकवाड, सदस्य माने ताई, सदस्य बानु सय्यद, अंगणवाडी सुपरव्हायजर रितू चव्हाण, डॉ.अपर्णा मुळे, परिचारिका आयोध्या भुसारे, आधिराज पालवे, सुनिल बोरचोट, ग्रामविकास अधिकारी अशोक सावंत, ग्रामपंचायत ऑपरेटर पूजा रास्ते , विकास सुर्यवंशी, गणेश अंकुशराव, मनिषा निकम, स्वाती रोखडे, सिंधू शिरढोणे, अंगणवाडी मदतनिस विद्या अंकुशराव व सर्व अंगणवाडी सेविका,बचत गट सदस्य, उपस्थित होते.

यावेळी महिला सक्षमीकरण सप्ताह बाबत मार्गदर्शन करण्यात आले.तर शालेय विद्यार्थ्यांना, शालेय बॅग, वह्या, पेन्सिल व इतर शालेय साहित्य वाटप करण्यात आले तसेच आलेल्या सर्व महिला सदस्य व अंगणवाडीतील मुलाना लाडू व खिचडी वाटप करण्यात आली.

यावेळी आरोग्य उपकेंद्र यांच्या वतीने, गरोदर माता तपासणी, रक्ततपासणी, उच्च रक्तदाब, मधुमेह , मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग, गर्भाशय मुखाचा कर्करोग तपासणी करण्यात आली. तसेच किशोरवयीन मुलींचे ल्इ तपासणी, घेऊन त्यांना आहार व आरोग्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. त्यांची आयुष्यमान कार्ड काढण्यात काढण्यात आली.सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अधिक परिश्रम सुमन फुले यांनी घेतले.

## वात्रटिका

### सन्माननीय 'ती'

शब्दाने का असेना पण
काल मोठा उत्सव झाला...
किती कौतुक आणि किती
गोडवा कित्येकानी गाईला...
कौतुकापेक्षा तिचा हक्क
तिला दिला,मिळाला पाहिजे...
घराघरातून असा संस्कार
सर्वांनी सांभाळला पाहिजे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात स्वामी विवेकानंदांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** '१८९३ साली स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय धर्मपरिषदेत केलेल्या ऐतिहासिक भाषणामुळे संपूर्ण जगाचा भारताकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. भारत हा ज्ञानाचे भांडार असलेला आणि वैभवसंपन्न देश आहे, याची जाणीव जगाला झाली. याच घटनेतून भारताच्या पुनरुत्थानाची मुहूर्तमेढ रोवली गेली,' असे मत श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र अयोध्या ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी व्यक्त केले. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठांमध्ये स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी ते बोलत होते. या सोहळ्याला श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूरचे सह–अध्यक्ष सद्गुरू गहिनीनाथ महाराज औसेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. याप्रसंगी माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे, विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी, कुलसचिव प्राणेश मुरनाळ,

सौ. उषा विश्वनाथ कराड, संचालक स्ट्रॅटजी अँड ऑपरेशन्स राघवेंद्र एम. चाटे, सिद्धेश्वर देवस्थानच पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पुष्पराज काडादी, सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त आशिष



लोकरे, चार्टर्ड अकाऊंटंट राज मिणियार, सोलापूर आर्किटेक्चर असोसिएशनचे असिम सिंदकी, कायझन होंडाचे संचालक सुरेन्द्र शिरकोळे आणि सोलापुरातील मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना स्वामी गोविंददेव गिरी महाराज म्हणाले, 'देशाच्या माननीय पंतप्रधानांनी आपल्या भाषणात पुढील दहा वर्षात आपण आपल्या देशाच्या गुलामगिरीच्या सर्व खुणा पुसून टाकण्याचा संकल्प करण्याचे आहावन केले. परंतु स्वातंत्र्यानंतर तसे कार्य करण्याची प्रेरणा कोणी दिली असेल तर ती स्वामी विवेकानंदांनी दिली आणि त्या गुलामगिरीच्या खुणा पुसण्याचे काम ज्या प्रकारे एमआयटीमध्ये प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्याकडून होत आहे ते पाहून स्तिमित व्हायला होत.' असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर समितीचे सह–अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, 'सत्ता, संपत्ती आणि कीर्ती पंचवण्यासाठी अध्यात्माचे बळ लागते आणि ते प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्याकडे असल्यामुळे त्यांनी संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराजांच्या वारकरी तत्वज्ञानाचा अंगीकार करत मूल्य शिक्षणाचा वारसा उभा केला.'

आपल्या अध्यक्षीय भाषणात एमआयटी समुहाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले की, 'ग्रामदैवत सिध्दरामेश्वराच्या भूमीत स्वामी विवेकानंद यांचा पुतळा उभारणी हा एक योग अभुतपूर्व आहे. सध्याच्या परिस्थितीत जगाला संताच्या विश्वात्मके देवाच्या प्रार्थनेची गरज आहे.' युनेस्कोमध्ये संत ज्ञानेश्वरांची विश्वकल्याणाचे पसायदान प्रार्थना पोहोचवता आल्याचे समाधान असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी बोलताना एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे यांनी 'वर्गामध्ये विषयाचे ज्ञान घेणे जसे आवश्यक आहे तसेच वर्गाच्या बाहेरही विद्यार्थ्यांना देशात होऊन गेलेल्या थोर महापुरुषांची महती समजावी आणि त्यातून त्यांना प्रेरणा मिळावी आणि त्यांचे व्यक्तिमत्व घडावे हे या संस्थेचे नेहमीच ध्येय राहिले आहे. विद्यापीठामध्ये उभारण्यात आलेला हा स्वामी विवेकानंदांचा पुतळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा देणारा ठरेल.' असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंडित भिमण्णा जाधव यांचे सुंद्री वादन झाले. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. गोपाळकृष्ण जोशी यांनी प्रास्ताविक केले तर कुलसचिव प्राणेश मुरनाळ यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, विद्यापीठाचे अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सध्या मुलांच्या बरोबरीने मुलीही प्रत्येक क्षेत्रात गुणवत्तेत अग्रेसर– रमाकांत पवार



**माढा (कटूसत्य वृत्त):–** भारतीय संस्कृती जरी पुरुषप्रधान असली तरी आज प्रत्येक क्षेत्रात मुलांच्या बरोबरीने मुलीही त्यांच्या कुशाग्र बुद्धीमत्तेच्या जोरावर प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत.एकही क्षेत्र असे उरले नाही की,त्या क्षेत्रात मुलींनी आपल्या स्वकर्तृत्वाच्या जोरावर नावालौलिक कमावला नाही. उलट सध्या काही क्षेत्रात मुलींचाच गुणवत्तेच्या बाबतीत दबदबा दिसून येत आहे. विशेषतः दहावी–बारावी बोर्डाच्या परीक्षेत मुलींनीच गुणवत्तेत बाजी मारली अशा मथळ्याखाली अनेक वेळा बातम्या वाचायला मिळतात.ही बाब महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने निश्चितच कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन केंद्रप्रमुख रमाकांत पवार यांनी केले आहे.

ते आनंदनगर–मानेगाव ता.माढा येथील श्री संत गाडगेबाबा माध्यमिक विद्यालयात जागतिक महिला दिन सप्ताहाच्या निमित्ताने घेतलेल्या विविध शैक्षणिक स्पर्धांचे बक्षीस वितरण करताना प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक तुकाराम कापसे होते.

प्रास्ताविक विठ्ठलवाडीचे आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड यांनी केले.

यावेळी लहान व मोठ्या गटात घेतलेल्या सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा व रांगोळी स्पर्धेतील यशस्वी आर्या बगडे, संस्कृती निकम, श्रावणी घोलप, अनुश्री लटके, वैष्णवी खोत, तृप्ती बगडे, अस्मिता लटके, आदिती भोगे, अनुष्का पवार, मयुरी लटके, आरती पवार, स्नेहा खोत, सिद्धी सुतार या विद्यार्थ्यांना केंद्रप्रमुख रमाकांत पवार व शिक्षकांच्या हस्ते प्रमाणपत्र, शैक्षणिक साहित्य व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले.यावेळी विद्यार्थिनी अस्मिता लटके, श्रुती घोगरे, मुख्याध्यापक तुकाराम कापसे यांनी मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन विद्यार्थिनी आरती पवार हिने केले. आभार सहशिक्षक सुनील खोत यांनी मानले.

यावेळी सांस्कृतिक विभागप्रमुख तनुजा तांबोळी, प्रविण लटके, माजी सरपंच शिवाजी भोगे, सचिन क्षीरसागर, सुनील खोत, तृप्ती कापसे, लहू गवळी,सागर राजगुरू,सोनाली घायतिलक यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# तालुक्याच्या विकासासाठी ९० कोटीहून अधिक निधीची तरतूद – आ.मोहिते पाटील



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** राज्याच्या अर्थसंकल्पात माळशिरस तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी रस्ते, पूल,तलाठी कार्यालये, न्यायालय इमारत, दुय्यम निबंधक कार्यालय, शासकीय विश्रामगृह तसेच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या बंधाऱ्यांच्या दुरुस्ती आदी विविध विकासकामांसाठी ९० कोटी रुपयांहून अधिक निधीची तरतूद करण्यात आली आहे.या निधीमुळे तालुक्यातील पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळणार असून नागरिकांना अधिक चांगल्या सेवा उपलब्ध होणार असल्याची माहिती आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी दिली. माळशिरस तालुक्यातील अनेक रस्ते दुरुस्ती व पूल बांधणीसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे.या कामांमुळे ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित आणि सोयीची होणार आहे. तसेच महसूल प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी नवीन तलाठी कार्यालयांच्या इमारती उभारण्यास निधीची तरतूद करण्यात आली आहे. माळशिरस सत्र न्यायालयातील न्यायाधीशांच्या निवासस्थान बांधण्यासाठी निधी देण्यात आला असून नागरिकांना आवश्यक कागदपत्रे आणि व्यवहार सुलभपणे करता यावेत यासाठी अकलूज दुय्यम निबंधक कार्यालयासाठीही तरतूद करण्यात आली आहे.त्याचबरोबर सरकारी अधिकारी आणि नागरिकांच्या सोयीसाठी माळशिरस व पिलीव येथे शासकीय विश्रामगृह उभारणीसाठीही निधी मंजूर करण्यात आला आहे.मागील काळात अतिवृष्टीमुळे गणेशगांव येथील को.प. बंधाऱ्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.त्या बंधाऱ्यांच्या दुरुस्ती आणि मजबुतीकरणासाठी देखील निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.यामुळे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढण्यास मदत होणार आहे.

तालुक्याच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे हा निधी मंजूर झाला असल्याचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी सांगितले. या निधीमुळे माळशिरस तालुक्यातील पायाभूत सुविधा अधिक मजबूत होऊन नागरिकांच्या दैनंदिन जीवनात मोठा सकारात्मक बदल घडेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त करून माळशिरस तालुक्याच्या विकासासाठी सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार यांचे तसेच महायुती सरकारचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी आभार मानले आहेत.

# चित्राज सिटी साईड रिसॉर्ट : प्राइड ऑफ सोलापूर म्हणून नावारूपास येईलः श्रीमती रंजना जवळकर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर हॉटेल चित्रा एक्झिक्यूटिव्हच्या यशस्वीतेनंतर खास सोलापूरकरांसाठी अकोलेकाटी, कोंडी – अकोलेकाटी रोड येथील चित्राज सिटी साईड रिसॉर्ट हे प्राइड ऑफ सोलापूर म्हणून नावाला नावारूपास येईल असे मत श्रीमती रंजना जवळकर यांनी व्यक्त केले.

उत्तर सोलापूर तालुक्यातील अकोलेकाटी गावात अकोलेकाटी – कोंडी रोडवर भव्य स्वरूपात उभारलेला चित्राज सिटी साईड रिसॉर्ट च्या उद्घाटन दरम्यान त्या बोलत होत्या. यावेळी संचालक धीरज जवळकर चित्ररेखा जवळकर आणि सीईओ कुणाल जवळकर उपस्थित होते.



सोलापूर शहरातील हॉटेल चित्रा एक्झिक्युटिव्ह हे आपल्या सेवेत गेल्या पाच वर्षांपासून कार्यरत आहेच. जवळकर परिवार ग्राहकांच्या समाधानाला आणि सेवेला प्राधान्य दिले आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यात पर्यटन विकासाला चालना देणे, पर्यटकांना दजेर्दार सेवा प्रदान करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची प्रस्तावना करताना संचालक सीए धीरज जवळकर यांनी सांगितले की निसर्गाच्या सानिध्यात असून, शांत, सुरक्षित आणि अल्हाददायक वातावरण चा अनुभव सोलापूरकरांना देण्यासाठी चित्राज सिटी साईड रिसॉर्ट ची निर्मिती केली आहे. लोकांना सोयीचे व्हावे म्हणून सोलापूर शहरापासून केवळ 15 किलोमीटर अंतरावर याची उभारणी करण्यात आली आहे.

या रिसॉर्ट मध्ये प्रशस्त आधुनिक पद्धतीच्या 80 रूम्स, सात हजार स्क्वेअर फुटचे बँक्वेट हॉल, 40 हजार स्क्वेअर फुट चे सर्वात मोठे लॉन, सोबत 12 हजार स्क्वेअर फुट चे छोटे लॉन, तसेच वॉटर पार्क, एडवेंचर पार्क, व्ही. आर. गेम्स, आर्केड गेम्स, इनडोअर आणि आउटडोअर गेम्स, रेन डान्स असे सुविधा उपलब्ध आहेत.

तसेच प्री – वेडिंग शूट, एंगेजमेंट, डेस्टिनेशन वेडिंग, कार्पोरेट प्रोग्रॅम्स, फॅमिली ट्रिप्स सह लग्न समारंभासाठी जवळजवळ 3000 ते पाच हजार लोकांची व्यवस्था असलेले मोठे लॉन उपलब्ध करून दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

अशा या अत्याधुनिक पद्धतीने सुरू झालेल्या या प्रकल्पाचे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चित्रात सिटी साईड रिसॉर्टचे मॅनेजर स्टाफ आणि जवळकर मित्रपरिवार यांनी प्रयत्न केले.

# महिलांच्या अडचणी प्राधान्याने सोडविणार– उपमहापौर देवकर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** प्रसार माध्यमात महिलांची संख्या वाढत आहे. त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. तळागाळापर्यंत माहिती पोहोचविण्याचे काम पत्रकार करतात. महिलांचे सक्षमीकरण ही काळाची गरज आहे. महिलांच्या अडीअडचणी, प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचा आमचा प्रयत्न राहिल, अशी ग्वाही उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी दिली. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि दयावान बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसार माध्यमात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा हॉटेल सिटी पार्क येथे उत्साही वातावरणात पार पडला. त्याप्रसंगी दैवकर बोलत होत्या. यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुण्या म्हणून मोनिका देवेंद्र कोठे, धनश्री विनायक कोंड्याल, नगरसेविका विजया नागेश खरात, धनश्री विनोद भोसले, माजी नगरसेविका मंगला दिलीप कोल्हे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे आदींची उपस्थिती होती.

यावेळी साक्षी सुराणा, गंगा कदम, तेजस्विनी पाटील, महापालिकेतील लिपिक माऊली अडकुर, श्रावणी सूर्यवंशी, उमादेवी अभंगराव यांचा विशेष सन्मान करण्यात आला तर प्रसार माध्यमातील महिलांचा भेटवस्तू देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. पत्रकार संघाचे खजिनदार किरण बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर उपाध्यक्ष उमेश कदम यांनी आभार मानले.

यावेळी नगरसेविका विजया खरात म्हणाल्या, प्रसारमाध्यमात महिलांची संख्या वाढत आहे. महिलांचे सर्वच क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान आहे. जागतिक महिला दिनानिमित्ताने महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान केला जातो. विविध क्षेत्रात महिला कार्यरत आहेत. यावेळी धनश्री भोसले आणि मंगला कोल्हे यांचीही भाषणे झाली.

**महिलांचा सन्मान म्हणजे प्रगतीकडे वाटचाल : कोठे**

मोनिका कोठे म्हणाल्या, महिला आपल्या कुटुंबाची काळजी घेतात. प्रत्येक यशस्वी स्त्री मागे पुरुष असतात म्हणूनच महिला पुढे जात आहेत. स्त्री–पुरुष समान आहेत एकमेकांचा आदर केला पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांचा सन्मान करत देशाच्या अर्थमंत्री पदाची जबाबदारी निर्मला सीतारामन यांच्याकडे सोपवली. महिलांचा सन्मान म्हणजे प्रगतीकडे वाटचाल हे ध्येय ठेवून कार्यरत राहिले पाहिजे, असे कोठे यांनी सांगितले

**महिला सन्मानाचा उत्सव रोज साजरा व्हावा : धनश्री कोंड्याल**

धनश्री कोंड्याल म्हणाल्या, महिला दिन हा केवळ एक दिवसाचा सन्मान सोहळा नाही तर वर्षभर महिलांचा सन्मान राखला पाहिजे. रोज हा उत्सव साजरा झाला पाहिजे. सर्व क्षेत्रातील महिलांचा मानसन्मान होत आहे. प्रसारमाध्यमातील महिलांचा सन्मान कौतुकास्पद आहे. पत्रकारिता लोकशाहीचा चौथा स्तंभ असून समाजमनाचा आरसा आहे. आज महिला राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचल्या आहेत. अनिष्ट रूढी परंपरा आणि महिला अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला पाहिजे ,असेही त्या म्हणाल्या.

# उपमुख्यमंत्री शिंदे यांनी टाकळीकरांना दिलेला शब्द पाळला

## शिवसेना संपर्कप्रमुख महेश साठे यांच्या मागणीला यश

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):–** पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये प्रबोधनकार ठाकरे चौक ते टाकळी चौक या रस्त्याचा समावेश करावा अशी मागणी आषाढी यात्रेदरम्यान महापूजेसाठी आलेले तात्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे शिवसेना सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे यांनी केली होती. त्यावेळी टाकळी येथे झालेल्या शिवसेनेच्या मेळाव्यात तात्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टाकळीकरांना दिलेला शब्द पाळा असून अर्थसंकल्पात पंढरपूर विकास आराखड्याला गती देण्यात आली असून पंढरपूर ते टाकळी उड्डाणपूलसह रस्त्याला ५० कोटी १६ लाख रुपये निधीची तरतूद केल्याने शिवसेना संपर्कप्रमुख महेश साठे यांनी शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आभार मानले.



याप्रसंगी बोलताना महेश साठे म्हणाले की शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी इतिहासात प्रथमच टाकळी ग्रामपंचायतीला मोठा निधी दिला आहे. यामध्ये टाकळी पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास आली असून, एक हजार बेडचे शासकीय रुग्णालय, टाकळी नगरपंचायत होण्याचा मार्ग लवकरच पूर्णत्वास येणार असल्याचे सांगितले.

यावेळी महेश साठे यांनी शिवसेना कामातून उत्तर देते असे सांगत विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला.

याप्रसंगी टाकळी गावचे माजी सरपंच संजय साठे, रोहन बचुटे, बालाजी बागल, धनंजय पाटील, सारंग महामनी, पांडुरंग शिंदे, प्रदीप भोसले, इंगवले सर, मारुती माने, भारत म्हात्रे, निंबाळे, बापू डोंगरे, विशाल माने, दादा कदम, आकाश कदम, जयकुमार सपकाळ उपस्थित होते.

दरम्यान अर्थसंकल्पात टाकळी उड्डाणपूल्यास रस्त्याला निधी देण्याची घोषणा झाल्यानंतर टाकळी ग्रामस्थांनी महेश साठे यांच्या निवासस्थानी एकत्र येऊन साठे यांचे आभार मानत पेढे वाटून जल्लोष साजरा केला.

दक्षिण काशी पंढरी नगरीत श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी देशभरातील भाविक मोठ्या संख्येने दाखल होत असतात येणाऱ्या भाविकांना चांगल्या सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इतिहासात प्रथमच पंढरपूरच्या वारी अगोदर पाहणी दौरा करून भाविकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देऊन एक वेगळा पायंडा घालून दिला आहे. राज्यातील पहिली शिवसेनेची ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टाकळी ग्रामपंचायतीला महेश साठे यांच्या माध्यमातून इतिहासात प्रथमच सर्वात मोठा निधी मिळाल्याने लवकरच गावचा कायापालट होणार असल्याने टाकळीकर नागरिकांकडून शिवसेनेचे आभार मानले जात आहे.

# सण–उत्सवांच्या पार्श्वभूमीवर बार्शी शहर पोलीस अलर्ट मोडवर

**बार्शी (कटूसत्य वृत्त):–** आगामी शिवजयंती (तिथीनुसार), रंगपंचमी, गुढीपाडवा, रमजान ईद आणि रामनवमी या सणांच्या पार्श्वभूमीवर बार्शी शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुरुवारी (दि. ५ मार्च) शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सर्व धर्मीय नागरिकांनी परस्पर सलोखा आणि सामाजिक ऐक्य जपत सण–उत्सव साजरे करावेत, असे आवाहन पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी केले.



सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांच्या सूचनेनुसार तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर यांच्या मार्गदर्शनाखाली दुपारी १२.३० ते १.३० या वेळेत ही बैठक पार पडली. बैठकीस शहरातील सर्व जाती–धर्मातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीदरम्यान धार्मिक सलोखा व सामाजिक ऐक्य जपण्यावर विशेष भर देण्यात आला. लहान–सहान कारणांवरून निर्माण होणारे वाद किंवा मुलांमधील किरकोळ भांडणांना जाती–धर्माचा रंग देऊन मोठे स्वरूप देण्याच्या घटना टाळाव्यात, असेही सांगण्यात आले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातून नागरिकांचे समाधान

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):–** महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन कामाला वेग देण्यासाठी आणि नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानातंर्गत आज तालुक्यातील कासेगांव, करकंब या मंडळातून 1 हजार 302 विविध सेवा व 562 विविध दाखले असे एकूण 1 हजार 864 सेवा व विविध दाखले देण्यात आले असल्याची माहित प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली.




या अभियानातंर्गत निकाली काढण्यात आलेले फेरफार 201, सातबारा मधील दुरुस्ती 24, डिजिटल सातबारा 224, 8 अ उतारे 176, विविध दाखले 562, एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत निकालात काढण्यात आलेले अर्ज 7, भूसंपादन प्रकरणी कमी–जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करण्यात आलेली प्रकरणे 2, सामाजिक योजना 45, शिधापत्रिका 221, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन व कृषी सिंचन योजना 106, आभा कार्ड, एच.बी, तपासणी व औषधोपचार 144, ई– मोजणी फेरफार नकाशा 152,आदी सेवा व दाखले देण्यात आले. यामध्ये कासेगाव मंडळातून 832 तर करकंब मंडळातून 1 हजार 32 विविध सुविधा एकाच छताखाली पुरवण्यात आल्याचे प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले.

14 मार्चला भाळवणी, पुळुज शुक्रवार दि. 10 एप्रिल रोजी खर्डी, पटवर्धन कुरोली, शुक्रवार दि. 17 एप्रिल रोजी भंडीशेगाव, रोपळे शुक्रवार दि. 8 मे रोजी पंढरपूर तर शुक्रवार दि. 15 मे रोजी तुंगत चळे या मंडळात शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी पंढरपूर तालुक्यातील संबधीत मंडळातील जास्तीत जास्त नागरिकांनी या महाराजस्व समाधान शिबिर मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार लंगुटे यांनी केले आहे.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य आदिनाथ देशमुख, पंचायत समिती सदस्य प्रमोद देशमुख, शहाजी मुळे, राहुल पूरवत, माजी जि.प. सदस्य हरिभाऊ गावंदरे, बाळासाहेब देशमुख, भूमी अभिलेख उपाधिक्षक पूजा आवताडे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, दीपक शिंदे, दुय्यम निबंधक श्री निराळी, सहा. महसूल अधिकारी दादा गावंदरे, तसेच संबंधित मंडळाचे मंडळ अधिकारी व तलाठी तसेच कर्मचारी उपस्थित होते .

# चि. ऋषिकेश दिलीप सोपल याचे पहिल्याच प्रयत्नात CA परीक्षेत उल्लेखनीय यश



**वैराग (कटूसत्य वृत्त):–** वैराग येथील चि. ऋषिकेश दिलीप सोपल याने लहानपणापासून शैक्षणिक तसेच क्रीडा क्षेत्रात सातत्यपूर्ण व उल्लेखनीय कामगिरी करत चार्टर्ड अकाउंटंट (CA) ही प्रतिष्ठेची परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला आहे.

ऋषिकेशने इयत्ता ४ वी व ७ वी शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण केल्या असून इयत्ता ७ वीमध्ये रॅशनल टॅलेंट सर्च परीक्षेत राज्यात तिसरा क्रमांक मिळवून आपली बुद्धिमत्ता सिद्ध केली. त्याची निवड प्रतिष्ठित जवाहर नवोदय विद्यालयातही झाली होती. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच क्रीडा क्षेत्रातही त्याने उल्लेखनीय कामगिरी करत स्टुडंट्स ऑलिम्पिक जिल्हास्तरीय कबड्डी (U–14) स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले.

पुढे मुंबईतील विले पार्ले येथील नरसी मोनजी (NM) कॉलेजमधून पदवी शिक्षण पूर्ण करत त्याने CFA लेव्हल–१ परीक्षाही यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली. शिक्षणाच्या प्रवासात त्याने अनेक पुरस्कार व प्रमाणपत्रे मिळवत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या सर्व यशस्वी वाटचालीचा पुढचा टप्पा म्हणून ऋषिकेशने आता उअ परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होऊन कुटुंब, शिक्षक व परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशस्वी प्रवासात त्याला वडील दिलीप सोपल (शिक्षक) तसेच थोरला भाऊ प्रथमेश सोपल (CA) आणि आई अरुणा सोपल यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# एस.व्ही.सी.एस. प्रशालेचे प्राविण्य परीक्षेत यश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** राज्य व जिल्हा गणित अध्यापक मंडळ यांच्या वतीने जानेवारी महिन्यात घेण्यात आलेल्या गणित प्राविण्य परीक्षेत एस. व्ही. सी. एस. हायस्कूल एमआयडीसी येथील विद्यार्थी चि. प्रणव बोडके व कु. सृष्टीबाबानगरे हे दोन विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यांची पुढील गणितं प्रज्ञा परीक्षेसाठी निवड झालेली आहे. या विद्यार्थ्यांना गणित शिक्षक नरेंद्र सुपे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे प्रशालेचे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक केदार पटणे यांनी अभिनंदन केले.